गुलाम कवयित्री

फिलीस व्हिटले

लेखिका: कॅथरीन लास्की

चित्रे: पॉल ली



तिचा स्वत:चा आवाज

एक गुलाम कवयित्री

फिलिस व्हिटले

हीची कहाणी

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन

आफ्रिकेतील सुखी आयुष्यापासून दूर

सुरुवातीला सारे काही काळेभोर दिसत होते. अगदीच काळकभिन्न! मग हा काळा रंग काळोखात मिसळून गेला आणि हेलकावे खात असलेल्या जहाजाच्या त्या खोलीत काही सावल्या दिसू लागल्या. हवेत काही दर्प जाणवू लागला. त्या छोट्या मुलीला काही आकृत्या दिसू लागल्या – काही माणसांच्या, काही स्त्रियांच्या, काही मुलांच्या. यांतील अनेक जण आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील *सेनेगांबिया* देशातील होते.

या व्यतिरिक्त तिने इथे-तिथे पळणाऱ्या उंदरांच्या आकृत्या आणि लोखंडी काळ्या बेड्यांची चमक पाहिली. सगळी माणसे बेड्यांमध्ये जखडलेली होती. गुलामांनी भरलेले ते जहाज आफ्रिकेच्या किनाऱ्यावरून रात्रीच्या मिट्ट काळोखात निघाले होते. जर या गुलामांना उमगले असते की त्यांना बळजबरीने त्यांच्या मायदेशापासून दूर घेऊन चालले आहेत, तर त्यांनी कदाचित बेड्यांची पर्वा न करता समुद्रात उड्या घेतल्या असत्या.

आता तिला वरून बेड्यांची खणखण ऐकू आली. काही माणसांना जहाजाच्या वरच्या भागात नाच करण्यासाठी नेत होते. त्यांना दररोज बेसुऱ्या संगीताच्या तालावर नाचावे लागत असे. कारण नाचले नाही तर त्यांच्या शरीराचे अवयव जखडून जात आणि त्यांचे स्नायू कमजोर होत. अशा अशक्त गुलामांना गुलामांच्या बाजारात कमी किंमत मिळत असे. मुलीने आपले डोळे बंद केले. तिच्या मनाच्या पटलावर काही वेगळेच चित्र उमटू लागले.

रात्रीचा काळोख पहाटेच्या लालीत बदलू लागला. आता सावल्यांच्या जागी एक स्त्री चालताना दिसू लागली. तिचे कपडे वाऱ्याने फडफडत होते. तिच्या हातात पोकळ भोपळ्याचा कटोरा होता. गुडघ्यांवर बसून तिने आपल्या दोन्ही हातात धरलेला कटोरा सूर्याकडे करत त्यातील पाणी जमिनीवर टाकले. ती स्त्री त्या मुलीची आई होती. ती रोज अशाच प्रकारे सूर्याचे स्वागत करत असे. ती मुलगी आपल्या आईला येथून पुढे कधीही भेटू शकणार नव्हती. पण सूर्याला पाणी अर्पण करणाऱ्या आईचे हे चित्र ती मनात जपून ठेवणार होती, एखाद्या मौल्यवान रत्नखड्याला जपतो तसे. याशिवाय ती ताडाची उंच झाडे, भोपळ्याचे मळे आणि हत्ती गवताची शेतेसुद्धा मनात जपून ठेवण्याचा प्रयत्न करणार होती.



आपण तिला फिलीस म्हणू.

दहा आठवड्यांच्या सागरी प्रवासानंतर जहाज अमेरिकेच्या *न्यू इंग्लंड* प्रांतातील *बोस्टन* बंदरात पोहोचले. तो 1761 सालच्या ग्रीष्म ऋतुतील दिवस होता. सर्व गुलामांना न्हाऊ घालून, त्यांच्या शरीराला तेल लावून त्यांची काळी-सावळी त्वचा चमकदार बनवण्यात आली. पण जहाजाचे मालक, श्रीयुत *फिच*, हे दृश्य पाहून चिडले. “बकवास माल आणलाय,” ते पुटपुटले. त्यांना म्हणायचे होते की या गुलामांमध्ये स्त्रिया आणि मुलेच जास्त आहेत. धष्टपुष्ट तरूण फार कमी आहेत. त्यांनाच तर चांगली किंमत मिळते बाजारात! गुलामांची विक्री *जॉन अवेरी* नावाचा दलाल करणार होता. त्यालासुद्धा काळजी वाटू लागली. त्याने लगेच त्या विवस्त्र लहान मुलीला स्वस्तात विकण्याचा निर्णय घेतला. ही मुलगी सतरंजीचा एक तुकडा कसाबसा अंगाभोवती लपेटून थंडीने थरथरत उभी होती. तिला पुढचे दोन दात नव्हते. त्यावरून ती सातेक वर्षांची असावी असा अंदाज अवेरीने केला. ती खूप अशक्त दिसत होती. न्यू इंग्लंडच्या कडाक्याच्या थंडीत ही जिवंत राहू शकेल का, अशी शंका त्याच्या मनात डोकावली.



सुंदर पेहराव केलेला एक पुरुष आणि एक स्त्री मुलीसमोर आले. ते अवेरीशी त्या मुलीबद्दल बोलू लागले. त्यांचे इंग्रजी शब्द काही मुलीला समजले नाहीत.

सुसाना व्हिटले घरकाम करण्यासाठी वयाने थोडीशी मोठी मुलगी शोधत होत्या. पण आता त्यांच्याकडे या दुबळ्या मुलीचाच पर्याय होता. अंगाभोवती सतरंजीचा तुकडा लपेटून थंडी सहन करत शांतपणे उभ्या असलेल्या त्या मुलीला पाहून सुसान कळवळल्या. त्या मुलीच्या चेहऱ्यात त्यांना काही वेगळेपण आढळले.

काही डॉलर देऊन त्यांनी मुलीला खरेदी केले. सुसान मुलीला घेऊन त्यांच्या बग्गीत बसली.

“काय नावाने हाक मारायची तिला?” जॉन व्हिटलेंनी पत्नीला विचारले. सुसान विचारात पडली. बग्गी निघाल्यावर तिने मागे वळून जहाजाकडे पाहिले. त्यावर *फिलीस* असे लिहिलेले होते.

“फिलीस....आपण तिला फिलीस म्हणू.”

फिलीसला बग्गीबाहेर आजवर न पाहिलेल्या विचित्र गोष्टी दिसू लागल्या, वेगवेगळे वास येऊ लागले. बंदरावर आणि जहाजावर डांबर, टर्पेंटाइनचे तीव्र वास येत असत. इथे दरवाजा खुला असलेल्या एका इमारतीतून दारुचा तीव्र वास येत होता. बग्गी बाजारातून जाऊ लागली तसे चहाचा सुगंध दरवळू लागला, एखाद्या विशाल पसरलेल्या ढगासारखा. मग चहाचे ढग गायब झाले आणि माशांचे वास येऊ लागले. फिलीसने एवढ्या साऱ्या माशांचा वास कधी घेतला नव्हता.

सभोवताली दिसणारे बहुतांशी चेहरे गोरे होते. पण काही लोक गव्हाळ वर्णाचे, काही पिवळे-तपकिरी तर काही काळ्या वर्णाचेही होते. बग्गी चालवणारा माणूस काळा होता. प्रत्येक जण लगबगीने चालत होता. अगदी स्त्रियासुद्धा त्यांचे पायघोळ कपडे सांभाळत घाईघाईत चालत होत्या. बोस्टनमधील ही दृश्ये फिलीससाठी पूर्णतः नवीन होती.

बग्गी लाल विटांनी बनलेल्या एका बंगल्यासमोर येऊन थांबली. हा बंगला किंग स्ट्रीट आणि मॅकेरल स्ट्रीट यांच्या कोपऱ्यावर होता.

न्यू इंग्लंड प्रांत अमेरिकेच्या उत्तर भागात आहे. तेथील गुलामांना अमेरिकेच्या दक्षिण भागातील गुलामांपेक्षा वेगळी वागणूक मिळत असे. त्यांना शारीरिक कष्टाची फारशी कामे करावी लागत नसत. पण फिलीसला इथे जशी वागणूक मिळाली तशी वागणूक न्यू इंग्लंड प्रांतातील कुणाही गुलामाला आजवर मिळाली नव्हती. सुसाना व्हिटले यांना सुरुवातीला घरकाम करायला गुलाम हवा होता. पण ही मुलगी वाटते त्यापेक्षा खूप बुद्धिमान आहे, हे त्यांच्या लक्षात आले. त्या बोलत तेव्हा फिलीस लक्षपूर्वक ऐकून लगेच समजून घेत असे. एकदा फिलीस कोळशाच्या तुकड्याने घराबाहेर काही अक्षरे गिरवताना त्यांनी पाहिली.

दक्षिण भागात गुलामाला लिहा-वाचायला शिकवणे हा गुन्हा होता. उत्तर भागात हा गुन्हा नव्हता, पण कुणी तसे शिकवतही नसे. “आफ्रिकन गुलामाला लिहा-वाचायला शिकवलं तर!” सुसाना व्हिटले यांच्या मनात आले. “यामुळे गुलाम बायबल शिकू, समजू शकेल.” फक्त गोरे लोकच भाषा आणि कलेवर प्रभुत्व मिळवू शकतात, हा समज खोटा ठरवायला हवा, असे तिला तीव्रतेने वाटू लागले. या विचाराने ती खूप उत्तेजित झाली.

मेणबत्ती, लेखणी आणि शाई

त्या खोलीत मेणबत्तीची ज्योत फडफडत होती. खोलीच्या एका कोपऱ्यात फिलीस टेबलसमोर बसली होती. ती बायबलच्या पानांच्या प्रती लिहून काढत होती. मेणबत्तीच्या प्रकाशाने तिच्याभोवती जणू सोनेरी प्रकाशाचे कवच निर्माण केले होते. सुसाना व्हिटले फिलीसच्या प्रगतीने खूप प्रभावित झाली होती. तिने फिलीसला फावल्या वेळात अभ्यास करण्यासाठी पुस्तके तसेच मेणबत्ती, लेखणी, शाई अशा वस्तू आणून दिल्या होत्या.

फिलीसला अमेरिकेत येऊन फक्त सोळा महिनेच झाले होते. या काळात ती इंग्रजी बोलायला तर शिकलीच, पण लिहायलाही शिकली. ती बायबलमधील काही अवघड मजकूर वाचायला आणि समजून घ्यायलाही शिकली. बराचसा मजकूर ती लिहून काढू लागली. फक्त नऊ वर्षांची असूनही ती बरेच काही शिकली, अगदी तेथील गोऱ्या मुलींपेक्षा आणि स्त्रियांपेक्षाही खूप जास्त! इंग्रजी शिल्यावर फिलीस लॅटीन, ग्रीक, भूगोल आणि गणित शिकू लागली. पण तिचा सर्वात आवडता विषय होता, कविता. कवितांमुळे मनात चित्रे उमटतात, अगदी स्पष्ट! हे तिला आवडत असे.

1765 सालच्या एके दुपारी पाहुण्यांना भोजन वाढताना फिलीसने एक अद्भुत गोष्ट ऐकली. श्रीयुत *हस्सी* आणि श्रीयुत *कॉफीन* नुकतेच *नन्टकेट* नावाच्या बेटाला भेट देऊन परतले होते. बोस्टनला येताना त्यांनी केलेल्या विलक्षण प्रवासाची हकीकत ते सांगत होते, “त्यांचे जहाज हिवाळी वादळवाऱ्यात सापडून बुडताबुडता बचावले. समुद्राच्या लाटा पर्वतापेक्षा उंच होत्या. गर्जणाऱ्या वाऱ्यांनी त्यांच्या जहाजाचे शीड छिन्नविछिन्न केले आणि डोलकाठीचेही तुकडेतुकडे झाले.” मग ही दोन माणसे कशी काय बचावली? त्यांना मृत्युचे भय वाटले नाही? फिलीसच्या मनात वादळात सापडलेल्या त्या दोन माणसांचे चित्र उमटू लागले. काय चमत्कार आहे! ही दोन माणसे आता सुखाने व्हिटले कुटुंबासोबत भोजन घेत होती.

या घटनेनंतर फिलीसने श्रीयुत हस्सी आणि श्रीयुत कॉफीन यांच्या भयावह प्रवासावर एक कविता लिहिली. ही कविता दोन वर्षांनंतर, 1767 साली *न्यूपोर्ट मर्क्युरी* या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. हीच फिलीसची प्रकाशित झालेली पहिली कविता. तेव्हा फिलीस फक्त 14 वर्षांची होती.

सुसाना व्हिटले थक्क झाली. तिने कल्पनाही केली नव्हती की तिने फिलीसबाबत केलेला छोटासा प्रयोग एवढा यशस्वी होईल. तिला एवढेच सिद्ध करायचे होते की आफ्रिकेतील कृष्णवर्णीय लोकसुद्धा लिहू-वाचू शकतात.

अतिशय उत्साहीत होऊन त्या फिलीसला बोस्टनमधील सुसंस्कृत कुटुंबांमध्ये नेऊ लागल्या. तिथे फिलीसने आपल्या कविता वाचून दाखवल्या.

एखाद्या कुटुंबातील स्त्री फिलीसला त्यांच्यासोबत चहापानासाठी बसवू पाहात असे, तेव्हा फिलीस हळुवारपणे म्हणत असे, “नको, आभार.” मग ती कोपऱ्यातील टेबलकडे बोट करून तिथे बसत असे. त्या कुटुंबातील स्त्रीला बरे वाटत असे. मग ती आपल्या गुलामांना सुंदर कविता वाचणाऱ्या या कृष्णवर्णीय कवयित्रिच्या टेबलवर चहा ठेवण्यास सांगत असे.

एकदा मात्र एका घरची स्त्री आणि तिच्या तीन मुली फिलीसला कोणत्या जहाजाने अमेरिकेला आणले होते, हे कळल्यावर अस्वस्थ झाल्या. हे घर त्या जहाजाचे मालक, *टिमोथी फिच* यांचे होते. फिलीसला हे कळले तेव्हा तिला तिथून लगेच निघून जावेसे वाटू लागले. पण श्रीमती फिच यांनी तिला थांबण्याचा आग्रह केला. त्यांच्या मुली शांत बसून राहिल्या. ती दुपार त्या सगळ्यांना दुःखद गेली.

फिलीस त्याच माणसाच्या घरी चहाचे घुटके घेत होती, ज्याने तिला बळजबरीने अमेरिकेत आणून सोडले होते. श्रीमती फिच यांना एका सुंदर किटलीतून चहा ओतताना पाहून फिलीसला आईची आठवण झाली. ती अशीच सकाळच्या सूर्याला कटोऱ्यातून पाणी अर्पण करत असे. हा तोच सूर्य होता, जो बोस्टनमध्ये चमकत होता तसेच आफ्रिकेमध्येही. आणि या सगळ्या स्त्रिया माता होत्या. कदाचित याच गोष्टीने फिलीस स्तब्ध झाली. या सगळ्या स्त्रिया माताच आहेत, मग त्या गोऱ्या असोत की काळ्या! पण गोऱ्या आईच्या मुलांना असं बळजबरीने पकडून आणत नसत.



धुमसणारा असंतोष

“स्वातंत्र्य, मालमत्तेचा हक्क आणि स्टँप करापासून मुक्तता!” रस्त्यावरच्या जमावाकडून देण्यात येणाऱ्या घोषणा व्हिटले यांच्या घरात ऐकू येत होत्या. व्हिटले कुटुंबाला आपल्या घराच्या खिडकीतून हा अनियंत्रित जमाव वाढतच चालल्याचे स्पष्ट दिसत होते.

डझनभर देशभक्त आपल्या खांद्यावर एक शवपेटी घेऊन चालत होते. त्यात बोस्टनचे नवनियुक्त स्टँप टॅक्स अधिकारी यांचा पुतळा ठेवला होता. इंग्लंडच्या सरकारने लावलेल्या एका नव्या करामुळे बोस्टनमधील लोकांमध्ये असंतोष पसरला होता. या करामुळे सर्व वृत्तपत्रे, कायदेशीर कागदपत्रे, टपाल, सूचना पत्रे इतकेच नव्हे तर खेळायच्या पत्त्यांवरही कर लावण्यात आला होता. हा जमाव कर अधिकाऱ्याच्या कार्यालयापर्यंत पोहोचला. त्यांनी कार्यालयाला आग लावली. मग ते स्टँप अधिकाऱ्याच्या घरी गेले आणि घराच्या खिडक्यांची तावदाने फोडली.

तेव्हा फिलीसने *स्वातंत्र्य* या विषयी विचारचिंतन सुरू केले. फिलीस ज्या वसाहतीत गुलाम म्हणून राहात होती, तेथील लोक इंग्लंडने लादलेल्या गुलामगिरीच्या बेड्या तोडण्यासाठी संघर्ष करत होते. किंग स्ट्रीटमधील घरातून तिला या नव्या संघर्षाचा जन्म होताना दिसला.

फिलीस बोस्टनच्या रस्त्यावर होणाऱ्या हिंसेबद्दल लिहू लागली. कधीकधी ती गुलामगिरीमुळे निर्माण होणाऱ्या हिंसेबद्दलही लिहीत असे. *अमेरिका* या कवितेत तिने इंग्लंडने तेथील वसाहतींवर लादलेल्या स्टँप कायद्याबद्दल भाष्य केले.

तिने लादले आपल्या लाडक्या मुलावर काही कर
आणखी एखादा लादण्याची शक्यता होती वर....
नका रडू मुलांनो, नको रडूस अमेरिके
ब्रिटनचे होते सौम्य, मधुर शब्द ते....

फिलीसच्या एकाच कवितेत बऱ्याचदा अमेरिकेच्या स्वातंत्र्याची चळवळ आणि तिचे स्वत:चे अपहरण व गुलामगिरी या दोन्ही गोष्टी दिसत. एका कवितेत, तिला स्वातंत्र्याविषयी इतके प्रेम का वाटते, याबद्दल फिलीस म्हणते, *नुकतंच कुठे बालपण उमलू लागलं अन् त्यांनी मला माझ्या प्रिय आफ्रिकेपासून हिरावून नेलं....* आपल्या आईवडीलांचा विचार तिच्या मनात नेहमी येत असे: “किती चिंता करत असतील ते माझी? किती दु:ख साठलं असेल त्यांच्या हृदयात?”

1770 सालच्या फेब्रुवारी महिन्यात असंतुष्ट युवा देशभक्तांच्या जमावाने एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या घराला घेराव घातला. अधिकारी बंदूक घेऊन बाहेर आला आणि जमावावर गोळ्या झाडल्या. *ख्रिस्तोफर स्नायडर*च्या छातीत गोळी लागली आणि तो ठार झाला. तो फक्त 11 वर्षांचा होता. सर्वांना धक्का बसला. फिलीसच्या मते, ब्रिटिश लोकांनासुद्धा! या घटनेवर लिहिलेल्या कवितेत तिने एका बालकाचा निर्घृण खून झाल्यावर प्रत्येकाच्या मनात धुमसत असलेल्या असंतोषाचा उल्लेख केला. फिलीसने ख्रिस्तोफरला क्रांतीचा पहिला हुतात्मा म्हटले.



ख्रिस्तोफर स्नायडरच्या मृत्यूनंतर दोन आठवड्यांनी पुन्हा हिंसा आणि रक्तपात झाला. याची सुरुवात फिलीसच्या घरासमोरील रस्त्यावरच झाली, साधे बर्फाचे गोळे मारण्यावरून! लोकांच्या एका समूहाने ब्रिटिश सैनिकांवर बर्फाचे गोळे फेकले. एका सैनिकाने बंदूक काढून गोळी झाडली आणि मग रक्ताचे पाट वाहिले. फिलीसने या हत्याकांडावर एक कविता लिहिली. या हिंसेमध्ये पूर्वी गुलाम असलेली एक कृष्णवर्णीय व्यक्ती ठार झाली. त्या व्यक्तिचे नाव होते, *क्रिस्पस अॅटक्स.* तो या क्रांतीचा पहिला कृष्णवर्णीय हुतात्मा ठरला.

माझी फिलीस

“याचं धाडसच कसं झालं, माझ्या फिलीसला शेजारी बसवण्याचं!” घरासमोर बग्गी येऊन थांबल्यावर सुसाना व्हिटले संतापाने धुमसत बोलू लागली. या थंडीच्या दिवसांत सर्दी, अस्थमाने हैराण झालेली फिलीस बग्गी चालक *प्रिन्स* याच्याच सीटवर शेजारी बसली होती.

सुसाना व्हिटले फिलीसच्या तब्येतीची खूप काळजी घेत असे. इतक्या थंडीमध्ये फिलीसला आपल्याच सीटवर बसवल्याबद्दल त्यांनी प्रिन्सला चांगलेच खडसावले. फिलीस मात्र गोंधळली होती. गोऱ्यांच्या घरांमध्ये ती एका कोपऱ्यात वेगळ्या टेबलवर बसत असे. पण बग्गीमध्ये मात्र तिचे एका कृष्णवर्णीय चालकाच्या सीटवर बसणे योग्य नव्हते! तिची त्वचा काळ्या वर्णाची होती, पण तिचे शिक्षण गोऱ्या लोकांसारखेच होते. तरीही व्हिटले यांचे घर वगळता, तिला गोऱ्या लोकांसोबत एकाच टेबलवर बसण्यास मनाई होती. मग तिची स्वत:ची अशी जागा कोणती? फिलीसला त्रिशंकू अवस्थेत लटकत असल्यासारखे वाटू लागले. व्हिटले कुटुंबासोबत चर्चमध्ये गेल्यावरही कृष्णवर्णीयांना गोऱ्या लोकांपासून वेगळ्या ठिकाणी बसावे लागे.



तरीही फिलीसला चर्चमध्ये जाणे आवडत असे. इंग्लंडमधून अमेरिकेत प्रवचन देण्यासाठी आलेले आदरणीय *जॉर्ज व्हाइटफिल्ड* यांनी तर तिच्यावर जणू मोहिनीच घातली होती. श्रीयुत व्हाइटफिल्ड यांची श्रद्धा होती की प्रत्येकाबद्दल प्रेम वाटणे, हाच खरा ख्रिस्ती धर्म! ते म्हणत, "अनाथ, गरीब, आदिवासी, गुलाम या सगळ्यांबद्दल प्रेम वाटले पाहिजे." गोऱ्या लोकांनी आपल्या कृष्णवर्णीय बांधवांना गुलाम म्हणून वागवणे, हे पाप आहे, असेही ते सांगत. ईश्वर वर्णभेद करत नाही, असे सांगणारे श्रीयुत व्हाइटफिल्ड यांचे हे प्रवचन फिलीसला कविता करण्यास स्फूर्ती देत. चर्चमधील अध्यात्मिक जगात फिलीसला मुक्त झाल्यासारखे वाटे. कवितांच्या जगात ती आपण गोरे आहोत की काळे आहोत, हेच विसरून जात असे. व्हाइटफिल्ड यांचे निधन झाले, तेव्हा फिलीस 16 वर्षांची होती. त्यांच्या मृत्यूने फिलीसला अपार दु:ख झाले. आईची आठवण येताच तिच्या मनात जसा सूर्याचा विचार येत असे, तसेच व्हाइटफिल्ड यांचासुद्धा! त्यांच्या प्रवचनामुळे न्यू इंग्लंडमधील लोकांच्या मनात नव्या प्रकाशाचा उदय झाला. तसेच फिलीसच्या मनातही तेजस्वी सूर्याची प्रतिमा पुन्हा जागी झाली. तिने जॉर्ज व्हाइटफिल्ड यांच्या सन्मानार्थ एक कविता लिहिली:

आम्ही दु:खात जगत असता,
तुमचा अस्त झाला
तेजस्वी हा आमचा सूर्य,
कुठे बरं लुप्त झाला?

ही कविता जाहिरात पत्रकांवर छापून अमेरिकेत तसेच इंग्लंडमध्येही प्रकाशित झाली. लोकांना कविता फार आवडली. वयाच्या सतराव्या वर्षी फिलीस प्रसिद्ध झाली.

परीक्षा

तो 1772 सालच्या वसंत ऋतूतील दिवस होता. पण न्यायालयात गारठाच जाणवत होता. अठरा सुशिक्षित व्यक्ती अर्धवर्तुळाकार बसलेली होती. फिलीसला त्यांच्या मध्यभागी उभे केले गेले. या सर्व सुप्रसिद्ध व्यक्ती होत्या. त्यांच्यामध्ये वसाहतीचे गव्हर्नर *जॉन हॅन्कॉक*, लेफ्टनंट गव्हर्नर *थॉमस हचीन्सन*, व्यापारी *अँड्र्यू ऑलीव्हर* आणि एक प्रतिष्ठित मंत्री होते.

पण पहिल्यांदा बोस्टनमध्ये पाऊल ठेवले तेव्हासारखे आता फिलीस विवस्त्र नव्हती की तिच्या शरीराला तेल चोपडले नव्हते. तरी पुन्हा एकदा काही गोरे अपरिचित लोक तिची किंमत ठरवणार होते. या व्यक्तिंनी फिलीसने लिहिलेल्या कविता वाचल्या होत्या. पण एक आफ्रिकन व्यक्ती कुणाच्याही मदतीविना अशा कविता लिहू शकते, यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. तिची मालकीण, एक आदरणीय ख्रिश्चन स्त्री, आणि तिचा पती मात्र ठामपणे सांगत होते की त्या कविता फिलीसनेच लिहिल्या होत्या. त्यांना तिच्या कवितांचे पुस्तक प्रकाशित करायची इच्छा होती. एका कृष्णवर्णीय स्त्रीने लिहिलेले पुस्तक! ही कल्पना तशी हास्यास्पदच होती त्या काळात.

फिलीसच्या शिक्षणाविषयी पुरावा मिळाल्याखेरीज तिच्या कविता प्रकाशित करता येणार नव्हत्या. फिलीसची परीक्षा घेण्यासाठी त्या व्यक्तिंनी तिला काय प्रश्न विचारले, याची माहिती कुणालाच नाही. कदाचित त्यांनी तिला ग्रीक भाषेतील क्रियापदे वाक्यात वापरून दाखवण्यास सांगितले असेल किंवा तिचा आवडता प्रसिद्ध कवी *जॉन मिल्टन* याची एखादी कविता म्हणून दाखवण्यास सांगितले असेल.

पण फिलीसने त्या सर्वांची खात्री पटवून दिली असेल. कारण त्या व्यक्तिंनी नोंद करून ठेवली आहे की “या कविता काही वर्षांपूर्वी आफ्रिकेतून आणलेल्या अशिक्षित, असंस्कृत फिलीस या तरूण कृष्णवर्णीय मुलीने लिहिल्या आहेत आणि ती आजही एक गुलाम आहे.” या प्रमाणपत्रानंतरही बोस्टनमधील प्रकाशकांनी एका कृष्णवर्णीयाचे पुस्तक प्रकाशित करण्यास नकार दिला. व्हिटले दांपत्य, विशेषत: सुसाना, मात्र हार मानायला तयार नव्हते. त्या फिलीसवर आपल्या मुलीसारखे प्रेम करू लागल्या होत्या. आपल्या मुलीला तिचा हक्क मिळवून द्यायचा, त्यासाठी तिला इंग्लंडला पाठवावे लागले तरी हरकत नाही असा ठाम निर्धार त्यांनी केला.

राजाची भेट

8 मे 1773 रोजी *फिलीस व्हिटलेने* आयुष्यात दुसऱ्यांदा सागरी प्रवास केला. पण हा प्रवास पूर्णत: वेगळा होता. ती आता दुर्गंधयुक्त, अंधाऱ्या जागेत अंगाचे मुटकुळे करून बसली नव्हती. तर सर्व सोयीसुविधा असलेल्या जहाजात स्वत:च्या खोलीत ती बसली होती. ती तिच्या प्रकाशकाला आणि तिच्या कविता वाचून प्रभावित झालेल्या इंग्रज लोकांना भेटायला चालली होती. यातील बरेच लोक एका ख्रिश्चन धर्मादाय संस्थेचे सदस्य होते, शिवाय आदरणीय जॉर्ज व्हाइटफिल्ड यांचे समर्थक आणि जवळचे मित्रसुद्धा! यांतील हटिंग्टनची विधवा पत्नी आणि डार्टमाउथचे उमराव यांनी पैसा उभारून आणि आपले संपर्क वापरून फिलीसचे पुस्तक प्रकाशित केले होते.

इंग्लंडला पोहोचल्यावर फिलीस व्हिटले जहाजातून उतरली. यावेळी ती गुलामांचा लिलाव करणाऱ्या बाजारात उभी नव्हती, तर सभ्य, सुसंस्कृत ब्रिटिश लोकांमध्ये उभी होती. तिची आश्रयदाता, हटिंग्टन यांची विधवा पत्नी, यांनी काही सुरेख घरांमध्ये फिलीसच्या पाहुणचाराची व्यवस्था केली होती. सर्वांना या अमेरिकी कृष्णवर्णीय गुलाम तरूण कवयित्रिला भेटायची इच्छा होती. अगदी इंग्लंडचा राजाही तिला भेटायला उत्सुक होता.

फिलीस इंग्लंडला येऊन काहीच दिवस झाले होते. सुसाना व्हिटले खूप आजारी असल्याची बातमी तिला मिळाली. फिलीसला पुढच्याच जहाजाने अमेरिकेत परतावे, असे वाटू लागले. राजाची भेट घेण्यासाठी आता तिच्याकडे वेळ नव्हता.

तिचा हा इंग्लंड दौरा छोटेखानी झाला तरी या दौऱ्यात काही विशेष घडले होते, असेच तिला जाणवत होते. जहाज इंग्लंडच्या किनाऱ्यापासून दूर दूर जाऊ लागले. फिलीसच्या मनात आले, अमेरिकेतील वसाहतींवर याच देशाची सत्ता आहे, आपल्या वसाहतींमध्ये याच देशाबद्दल असंतोष आहे, पण याच देशाने आपल्यासारख्या एका गुलाम मुलीच्या कवितांचे पुस्तक प्रकाशित केले. कुणा कृष्णवर्णीय अमेरिकी स्त्रीने लिहिलेले हे पहिलेवहिले पुस्तक होते.

पुस्तके, स्वातंत्र्य आणि क्रांती

दिवसेंदिवस अमेरिकी वसाहतींमध्ये गुलामगिरीविरोधात असंतोष वाढू लागला. फिलीस अमेरिकेत परतल्यानंतर चार महिन्यांनी, तिच्या योग्यतेवर शंका घेणारा जॉन हॅन्कॉक याने एक गुप्त योजना आखली. त्यानुसार, कडाक्याच्या थंडीत एके रात्री देशभक्त क्रांतिकारक रेड इंडियन लोकांच्या वेषात बोस्टन बंदरात शिरले. तिथे चहाच्या खोक्यांनी भरलेल्या इंग्लंडच्या जहाजात गुपचुप प्रवेश करून ते चहाचे खोके समुद्रात फेकू लागले.
फिलीस आपल्या किंग स्ट्रीटमधील घरातून ही *बोस्टन चहा पार्टी* पाहू शकली नाही. ती खोलीत सुसानाची काळजी घेत होती. पण तिला क्रांतीकारकांच्या आरोळ्या स्पष्टपणे ऐकू येत होत्या. एक-दोन दिवसांनी ज्या बंदरात तिच्या पहिल्या पुस्तकाच्या प्रती येणार होत्या, त्या बंदरात आता चहाचे खोके तरंगत होते.

24 जानेवारी 1774 रोजी *बोस्टन गॅझेट* या वृत्तपत्रात एक जाहिरात छापून आली.

आज प्रकाशित होत आहे,
एका कवयित्रिच्या मोहक कोरीवकामाने सजलेले पुस्तक.
कविता – विविध विषयांवर आधारित
कवयित्री: फिलीस व्हिटले
एक कृष्णवर्णीय तरुणी
विक्रेता: मेसर्स कॉक्स अँड बेरी
किंग स्ट्रिट, बोस्टन.

पुस्तकाची विक्री तर चांगली झाली. आणखी तीनशे प्रती मागवण्यात आल्या. त्या 6 मे 1774 रोजी येऊन पोहोचल्या. जर त्या तीन आठवडे उशीरा आल्या असत्या, तर त्या इथवर पोहोचू शकल्या नसत्या. कारण 1 जून रोजी ब्रिटिश संसदेने दिलेल्या आदेशानुसार, बोस्टन बंदर बंद करण्यात आले होते. क्रांती सुरू होण्याच्या बेतात होती. ब्रिटिशांनी बोस्टनमध्ये सैनिकांच्या आणखी पलटणी पाठवल्या. लाल कोट घातलेले हे सैनिक नागरीकांच्याच घरांमध्ये राहू लागले, व्हिटले यांच्या घरीसुद्धा.

बंदर बंद केल्यामुळे जीवनाश्यक वस्तुंची मंदी जाणवू लागली. असे डावपेच वापरून इंग्लंड वसाहतींना नामोहरम करू इच्छित होता. पण बोस्टनच्या उत्तरेकडील *मार्बलहेडच्या* मच्छिमारांनी बोस्टनच्या रहिवाशांसाठी कॉड मासे पाठवले. नजिकच्या *चार्ल्सटाऊन* शहराने तांदूळ पाठवले. दूर दक्षिणेकडील *बाल्टिमोर*ने पाव आणि मद्य पाठवले. अगदी कनेक्टिकट येथूनही देशभक्त पायी चालत 258 मेंढ्यांचा कळप घेऊन बोस्टनला आले. अशा परिस्थितीत, वसाहतीतील लोक कवितेबद्दल विचारही करू शकत नव्हते. तरीही फिलीस कविता लिहितच राहिली.

त्याच वर्षी वसंत ऋतूत सुसाना व्हिटले यांचे निधन झाले. पण जाण्यापूर्वी त्यांनी फिलीसचे यश डोळे भरून पाहिले. फिलीस इंग्लंडवरून परतल्यावर काही दिवसांनी व्हिटले दांपत्याने तिला गुलामगिरीतून मुक्त केले होते. पण ज्या घरात आपले पालनपोषण झाले, ते घर सोडून जाण्याची फिलीसची इच्छा नव्हती.

कवयित्रिचा आवाज

मेणबत्तीच्या प्रकाशात फिलीस आपल्या खोलीत बसली होती. क्षितीजावर सूर्योदय होत होता आणि फिलीसच्या मनात अनेक चित्रे उमटत होती. सूर्याला पाणी अर्पण करणारी आई, आफ्रिकेतील हवेवर झुलणाऱ्या उंच गवतांची अमर्याद मैदाने. याच हवेने तिचे अपहरण करणाऱ्या जहाजाची शिडे भरली होती, त्या जहाजाला गती दिली होती. फिलीस मनात उगवत्या सूर्याची छबी साठवण्याचा प्रयत्न करत होती.
एका नव्या कायद्यान्वये, बोस्टनच्या नागरिकांना आपल्या घरी इंग्रज सैनिकांना आसरा देणे सक्तीचे केले होते. व्हिटले यांच्या घरी दोन इंग्रज सैन्याधिकारी राहात होते. त्यांच्यापैकी एका अधिकाऱ्याने तिला एक कविता लिहून पाठवली होती. फिलीस त्याला उत्तरादाखल काय लिहायचे, याचा विचार करत होती. या कवितेत फिलीस आपला मायदेश आफ्रिकेचे वर्णन करण्याचा प्रयत्न करत होती. ती आफ्रिकेचे सुंदर देखावे आठवत होती. शेवटी, इथे, तिथे, इंग्लंडमध्ये चमकत असलेला तो सूर्य एकच तर होता. आपल्या मनात उमटणारे चित्र ती त्या अधिकाऱ्याला दाखवू इच्छित होती, जो इंग्लंडच्या राजाच्या आज्ञेवरून अमेरिकेस नमवण्यासाठी इथे आला होता. एक कवयित्री असल्यामुळे आपण हे केलेच पाहिजे, असे तिला वाटत होते.

समारोप

ब्रिटिश नौदल अधिकाऱ्याला उत्तर म्हणून लिहिलेल्या कवितेनंतर एका वर्षाने फिलीसची अमेरिकी लष्कर प्रमुख *जॉर्ज वॉशिंग्टन* यांच्याशी भेट झाली. जनरल वॉशिंग्टन आपल्या सैनिकांसमवेत *मॅसेच्युसेट्स* राज्याच्या *केंब्रिज* शहरातील मुख्यालयात उतरले होते. काही काळापूर्वी फिलीसने त्यांना एक पत्र लिहिले होते. त्यात तिने आपली एक कविताही लिहिली होती. कवितेचे शीर्षक होते, *महनीय जनरल वॉशिंग्टनप्रती.*
28 फेब्रुवारी 1776 रोजी उत्तरादाखल पाठवलेल्या पत्रात वॉशिंग्टन यांनी तिचा उल्लेख *मिस फिलीस* असा केला. आयुष्यात प्रथमच जॉर्ज वॉशिंग्टन यांनी एका कृष्णवर्णीय स्त्रीचा उल्लेख *मिस* असा केला, असे काही विद्वानांचे मत आहे. त्याच वर्षी मार्च महिन्यात, कवयित्री आणि जनरल यांची केंब्रिज येथे भेट झाली. तिने जनरलसाठी लिहिलेली कविता पुढल्याच महिन्यात *थॉमस पेन* संपादक असलेल्या *पेनसिल्व्हेनिया* पत्रिका या मासिकात प्रकाशित झाली.
1778 साली फिलीसने *जॉन पीटर्स*शी लग्न केले. तो नुकत्याच सुरू केलेल्या व्यापारात जम बसवण्याचा प्रयत्न करत होता. फिलीसला तीन मुले झाली पण सर्व बाल्यावस्थेतच मृत्यू पावली. 1783 पर्यंत अमेरिकी क्रांती शमली होती. 1784 मध्ये फिलीस व्हिटलेने तिची अंतिम कविता लिहिली *स्वातंत्र्य आणि शांती.* ही कविता तिने नागरी युद्ध संपुष्टात आल्याचा आनंद साजरा करण्यासाठी लिहिली होती. त्याच वर्षी बोस्टनमधील एका बोर्डिंगमध्ये निर्धन स्थितीत फिलीस व्हिटलेचा मृत्यू झाला. ती फक्त 31 वर्षांची होती. पण तिने अमेरिकी साहित्यात आपली अमिट छाप उमटवली.

लेखिकेचे मनोगत

एक लेखिका म्हणून फिलीस व्हिटलेच्या कहाणीने मला आकर्षित केले. कारण ही केवळ कवयित्री बनलेल्या एका अशिक्षित गुलाम मुलीची कहाणी नव्हती तर एका आवाजाची तसेच स्वतःचा आवाज, व्यक्तिमत्व, स्वातंत्र्य यांच्यातील परस्पर नात्यांचीही कहाणी होती. गुलामगिरी आणि इतर दडपशाही यांच्यामध्ये हीच समानता आहे की ते आवाज दाबून टाकतात. आवाज नसणं हे माणूस नसण्यासारखेच असते. यासाठीच तर गुलामांना लिहा-वाचायला शिकण्यास मनाई होती. आपला आवाज दाबून टाकला जातो तेव्हा, एक वंश म्हणून तसेच एक प्रजाती म्हणूनही, आपल्यातील माणुसपण कमी होते. फिलीसला पहिल्यांदा स्वातंत्र्य तेव्हा मिळाले जेव्हा ती लिहा-वाचायला शिकली, कवयित्री म्हणून तिला आपल्या आवाजाचा शोध लागला. तिला दुसऱ्यांदा स्वातंत्र्य तेव्हा मिळाले जेव्हा ती गुलामगिरीतून मुक्त झाली असल्याची कागदपत्रे तिच्या हातात आली.

चित्रकाराचे मनोगत

फिलीस व्हिटलेची कहाणी मला स्फूर्तीदायक वाटली. कारण ही अमेरिकी इतिहासातील एक विलक्षण कहाणी आहे. या तरूण गुलाम कवयित्रिने तिचे अपहरण, अमेरिकेपर्यंतचा खडतर प्रवास आणि तिथे गुलाम म्हणून विक्री अशा क्लेशकारक घटनांवर मात केली. गुलामांना साधे लिहा-वाचायला बंदी होती, त्या काळात ती एक कवयित्री म्हणून प्रसिद्ध झाली. फिलीस व्हिटलेने सिद्ध केले की तुम्ही प्रयत्न केलात तर सर्व काही शक्य आहे. तुम्ही मुक्त असाल तर कोणतेही ध्येय प्राप्त करू शकता.